पुणेजिल्हापरिषद,पुणे
यशवंतरावचव्हाणभवन
शिक्षणविभाग(प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/स्वयंअशाळा/२०८/2022
पुणे1दिनांक:- 11/02/2022

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
नुतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ,
पवना प्राथमिक विद्या मंदिर ,
पवनानगर,ता.मावळ,जि.पुणे-410406

विषय:- सन 2017-18 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ :- 1.शासन निर्णय क्र एसएफएस-1017/प्र.क्र.619/एसएम-2,दिनांक-26/09/2017
2. शिक्षण उपसंचालक पुणे क्र. शिउस/प्राथ-202/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/2017/8769,दिनांक-6/12/2017

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र .2 च्या निर्णयानुसार **खालील अटी व शर्तीवर विद्यमान** प्राथमिक **इयत्ता 1 ली ते इयत्ता 4 थी साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नुतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ | पवना प्राथमिक विद्या मंदिर , पवनानगर,ता.मावळ, जि.पुणे-410406 | इंग्रजी | नवीन शाळा(स्टेट बोर्ड) (स्वयंअर्थसहाय्यित शाळा) | प्राथमिक इयत्ता 1 ली ते इयत्ता 4 थी | २०२१-२२ |

## अटी व शर्ती

1. संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
2. शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
3. याअधिनियमातील तरतुदीनूसार वर्ग करण्यास परवानगी दिलेली आहे.
4. संदर्भ क्रमांक 02अन्वये सन २०२१-२२ मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे.परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकारअधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यितशाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्गअसे दर्शविणारा फलक लावणे बंधन कारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यितशाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन निर्णय क्र. एसएफएस-1017/प्र.क्र.619/एसएम-2,दिनांक-26/09/2017 तील अटी शर्तीतील मुददा क्र. 2 चे पुर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
9. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 याअधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

11.2.22
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणेजिल्हापरिषद,पुणे

प्रत - माहितीसाठी सविनय सादर-
1)मा.अवरसचिव,शालेय शिक्षण व क्रीडाविभाग,मंत्रालय,मुंबई-32.
2)मा.शिक्षण संचालक(माध्य.वउच्च माध्य.),शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1
3)मा.शिक्षण संचालक(प्राथमिक),शिक्षण संचालनालय,महाराष्ट्रराज्य,पुणे-1.